# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/11/2023 (मंगळवार) दुपार


---

### :: जनतेस नागपूर ग्रामीण पोलीसांचे आवाहण ::

परप्रांतातून नागपूर जिल्हयात काम करण्याकरीता मोठया संख्येने मजूर वर्गातील लोक येतात, नागरिक त्यांना कामावर नोकर म्हणुन ठेवतांना त्यांचे ठाव ठिकाणाबाबत कुठलीही शहानिशा न करता त्यांना कामावर ठेवून घेतात. नागरिकांचे अशा निष्काळजीपणामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीचे व्यक्ती सहजरित्या नागपूर येथे आपले वास्तव्य करुन राहतात. मागील काही दिवसांपुर्वी पाचगांव येथील कुंदन ढाबा मालकाची निर्घुन हत्या मध्यप्रदेशातील मंडला व ओरीसा येथील संभळपूर येथे राहणाऱ्या दोन नोकरांनी केली होती. अश्या घटना पहाता जनहिताच्या सुरक्षीततेच्या दृष्टीकोणातुन नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, परराज्यातील व्यक्तींना नोकर म्हणुन कामावर ठेवतांना त्यांची ओळख पटविण्याकरीता वैद्य कागदपत्रे तपासून घ्यावे, तसेच त्यांची योग्य पडताळणी करुन घ्यावी. अन्यथा गुन्हेगार पार्श्वभुमींच्या व्यक्तींना कामावर ठेवल्याने नागरिकांना गंभीर घटनेंचा धोका उद्‌भवू शकतो.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर